गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : २१८, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026


सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे


अग्रलेख

**नव्या सरकारचा आज शपथविधी**

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

......पान ४ वर



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## नव्या सरकारचा आज शपथविधी

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण होणार? याकडे अनेकांच्या नजरा लागल्या होत्या. अखेर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? हे स्पष्ट झाले आहे. भाजपाच्या आमदारांची नुकतीच गटनेता निवडीची बैठक पार पडली. या बैठकीत गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची सर्व आमदारांनी एकमताने निवड केली आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री असणार आहेत.देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाचा शपथविधी सोहळा आज दि. ५ डिसेंबर रोजी मुंबईत पार पडत आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह काही राज्याचे मुख्यमंत्री आणि दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी सर्व आमदारांचे आणि जनतेचे आभार मानले. तसेच आमदारांना संबोधित करत असताना एक है तो सेफ है असा नारा फडणवीस यांनी देत विरोधकांच्या जखमेवर मीठ चोलाल्याचे दिसून आले. देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या मुख्यमंत्रीपदी तिसर्या वेळा विराजमान होत आहेत. नगरसेवक, महापौर, विरोधीपक्षनेते, उपमुख्यमंत्री आणि आता पुन्हा मुख्यमंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द आहे. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्री, विरोधीपनेते, उपमुख्यमंत्री अशी तिन्ही महत्वाची पदे भूषविली होती. देवेंद्र फडणवीस यांनी गटनेतेपदी निवड होताच सर्व आमदारांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात विजयाची मालिका ही लोकसभेनंतर पुन्हा एकदा हरियाणापासून सुरु झाली. महाराष्ट्राने जे बहुमत आपल्याला दिले. त्याबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत घालतो. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही मी आभार मानतो, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.महायुती सरकारचा शपथविधी आज दि. ५ डिसेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होत आहे. या सोहळ्यासाठी जय्यत तयारी सुरु करण्यात आलेली आहे.राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हे विदर्भातील पाचवे व नागपूरचे दुसरे मुख्यमंत्री ठरतील.फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या दरम्यान पूर्ण पाच वर्षासाठी मुख्यमंत्री राहिल्यानंतर २०१९मध्ये औटघटकेचे मुख्यमंत्रीपद वगळता ते पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत.राज्यात अशा रीतीने पुन्हा एकदा महायुतीचे सरकार सत्तेवर विराजमान होत आहे. मुख्यमंत्री पदाच्या चर्चेकरता केंद्रीय निरिक्षक नुकतेच मुंबईत आले होते. निर्मला सीतारामण आणि विजय रुपाणी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. तर उर्वरित भाजपाच्या आमदारांनी देवेंद्र फडणवीसांच्या नावावर अनुमोदन दिलं. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला सत्तास्थापनेचा तिढा अखेर सुटला आहे. महायुती सरकारचा शपथविधी आज आझाद मैदानात पार पडत आहे. त्यासाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले असून, त्यावर पहिल्या रांगेत पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांची आसन व्यवस्था असेल. तर मागे एका बाजूला मंत्री, तर दुसऱ्या बाजूला काही अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची व्यवस्था करण्यात येणार आहे. समोर सुमारे २५ हजार लोकांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महायुतीला सत्तेवर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिलांसाठी शपथविधीच्या ठिकाणी लाडकी बहीण कक्षउभारण्यात येणार असून, तेथे १० हजार महिलांची व्यवस्था केली जाणार आहे. दि. २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीला निर्वावद बहुमत मिळाल्याचे स्पष्ट झाले. बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीची सत्ता येणार हे निश्चित झाले होते. परंतु, मुख्यमंत्री पदावरून चर्चा सुरु होती. एकनाथ शिंदेंही मुख्यमंत्री पदासाठी अडून बसल्याची चर्चा होती. त्यामुळे हा तिढा कधी संपणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. दुसरीकडे भाजपाचा मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाले होते. दरम्यान, विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत विधिमंडळ नेता निवडीची औपचारिकता नुकतीच पार पाडली. बैठकीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांनी केंद्रीय निरीक्षक म्हणून काम पाहिले. देवेंद्र फडणवीस यांचे शालेय शिक्षण नागपुरमधील इंदिरा कॉन्व्हेंटमधून झाले. त्यानंतर त्यांनी शंकरनगर येथील सरस्वती विद्यालयात आणि धरमपेठ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यांनी नागपूरच्या शासकीय विधी महाविद्यालयातून १९९२ मध्ये पदवी प्राप्त केली. त्यांनी व्यवसाय व्यवस्थापनात पदव्युत्तर पदवी आणि डीसीई, बर्लिनमधून प्रकल्प व्यवस्थापनाच्या पद्धती आणि तंत्रात पदविका प्राप्त केली आहे. फडणवीस यांनी आत्तापर्यंत मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेते, उपमुख्यमंत्री, नागपूरचे महापौर, नगरसेवक असे काम पाहिले आहे. तसेच भाजपा या राष्ट्रीय पक्षात प्रभाग अध्यक्ष, भाजयुमो, पदाधिकारी, नागपूर (पश्चिम) भाजपा, नागपूर अध्यक्ष, भाजयुमो, प्रदेशाध्यक्ष–भाजप ही पदे भूषवली आहेत. फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजापाला महाराष्ट्रात प्रथम सत्ता प्राप्त झाली. याचे श्रेय अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदींना जाते. परंतु फडणवीस यांनी राजकीय खेळी करत विरोधकांचा अनेकवेळा निवडणुकीत धुव्वा उडवला आहे. फडणवीस यांचे राजकीय ज्ञान, राजकीय कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. ज्या राज्यात भाजपाचे दोन ते तीन आमदार होते, त्या राज्यात फडणवीस यांनी भाजपाचे बहुमत तयार केले. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना मुख्यमंत्रीपदाची तीन वेळा संधी दिल्याचे दिसते. आज मुंबईत महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी होत आहे. त्यामुळे हे नवे सरकार महाराष्ट्रातील जनतेला विकासाची वाट दाखवेल ही अपेक्षा आहे. नव्या सरकारच्या कारकिर्दीसाठी जनतेच्या वतीने शुभेच्छा !

# नवी मुंबई महानगरपालिकेची संविधान साक्षरतेच्या दिशेने नियोजनबद्ध वाटचाल

## संविधान परिचय कार्यशाळा उत्साहात संपन्न

**नवी मुंबई – भारताचे संविधान हे केवळ एक पुस्तक नाही तर आपल्या जीवनशैलीचे मार्गदर्शक आहे अशा शब्दात संविधानाचे महत्व विशद करीत माजी मुख्य आयुक्त जे.एस. सहारिया यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा थेट जनतेशी संबंध असल्याने महानगरपालिकेतील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्याला समाजासाठी उपयोगी पडण्याची ही उत्तम संधी असल्याचे जाणून काम करावे असे सांगितले. यादृष्टीने संविधानातील मूल्यांचा आपल्या कामकाजात कसा उपयोग होईल व यातून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व समाजातील शेवटच्या माणसाला कशी मदत होईल याचे भान राखून काम करायला हवे असे ते म्हणाले.**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अमृत महोत्सवी संविधान पर्वानिमित्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित संविधान परिचय कार्यशाळेमध्ये ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. सेक्टर १५, ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकातील सभागृहामध्ये संपन्न झालेल्या 'संविधान परिचय कार्यशाळे'प्रसंगी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त समीर उन्हाळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे तसेच कार्यशाळेतील व्याख्यात्या कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरम आशियाच्या प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक अनुया कुंवर, संविधान अभ्यासक लेखक सुरेश सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरम आशियाच्या प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक श्रीम.अनुया कुंवर यांनी संविधानाचे महत्व जाणून त्याची महती जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करणारी पहिली महानगरपालिका म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचा गौरव केला. कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरमच्या वतीने सुशासनासाठी करण्यात येणाऱ्या धोरणांची माहिती देत त्यांनी अबार्डिन अजेंडानुसार सुशासनासाठी प्रमाण मानके म्हणून निश्चित केलेल्या १२ तत्वांचे विवेचन केले. संविधानाने सांगितलेल्या मूल्यांचा आपण दैनंदिन कामकाजात वापर करीत आहोत काय? असा प्रश्न स्वत:लाच विचारून प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने आत्मचिंतन केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.



संविधानाचे अभ्यासक श्री.सुरेश सावंत यांनी हे ज्ञानस्मारक म्हणजे प्रेरणास्थान असून याठिकाणी आल्यानंतर समृध्द झाल्यासारखे वाटते असे सांगत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'नवी मुंबई संविधान साक्षर मोहीम' राबविण्याचे सुव्यवस्थित नियोजन केल्याबद्दल प्रशंसा केली. ही मोहीम राबविताना पहिल्या टप्प्यात संविधान परिचय वर्ग आयोजन व दुसऱ्या टप्प्यात घर घर संविधान साक्षर मोहीम राबविली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. या नियोजित मोहीमेचा आराखडा सादरीकरणाव्दारे मांडत त्यांनी संविधान समजणे ही साक्षरतेची पहिली पायरी असल्याचे सांगितले व संविधानाची उद्देशिका हे तिचे सार असून उद्देशिकेतील मूल्यांचा अर्थ उलगडून सांगितला.

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी समारोप करताना कार्यशाळेत विचारमंथन झालेल्या विविध मुद्दयांचा परामर्श घेतला. संविधानाने ज्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाला हक्क व अधिकार दिले आहेत तशीच काही कर्तव्यदेखील सांगितली आहेत, त्यादृष्टीने लोकजागृती करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले. मनुष्याचा विकास व्हावा हे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून काम करताना 'मी इथे का आहे?' असा प्रश्न प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी स्वत:ला विचारला पाहिजे व आपल्याला जनतेसाठी काम करण्याची मोठी संधी महानगरपालिकेचा कर्मचारी म्हणून मिळाली याची जाणीव ठेवावी असे ते म्हणाले. आपल्या अधिकारांचा वापर शिक्षा करण्यासाठी नाही तर माणसाचे जीवन आनंदी करण्यासाठी आहे याचे भान राखून काम करावे असे मत यावेळी आयुक्तांनी व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेने आधुनिक काळाला साजेशी संगणकीय ऑनलाईन कार्यप्रणाली अंगिकृत करीत नागरिकांसाठी ग्रिव्हेन्स रिड्रेसल सिस्टीम, माय एनएनएमसी प विकसीत केले असून नागरिकांच्या तक्रारी सोडवणुकीसाठी नियोजनबध्द कार्यप्रणाली आत्मसात केली आहे तसेच थेट संवादी दृष्टीकोन ठेवला आहे असेही आयुक्तांनी सांगितले. व्याख्यात्यांनी मांडलेल्या बाबींवर सविस्तर भाष्य करताना समाजातील सर्व घटकांपर्यंत संविधान साक्षरता मोहीम पोहोचविण्यासाठी ठोस नियोजन केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे यांनी प्रास्ताविकपर मनोगतात ज्ञानकेंद्र म्हणून नावाजल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील उल्लेखनीय सुविधांची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देत संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने यापुढील काळात शासनाने निर्देशित केल्यानुसार 'घर घर संविधान' अभियान व्यापक स्वरुपात राबविले जाणार असून त्याचा प्रारंभ या संविधान परिचय कार्यशाळेने झाला.

# हजार कोटींच्या करवसुलीचे पालिकेपुढे आव्हान

**नवी मुंबई : शहरात नव्या मालमत्तांचा शोध घेऊन उत्पन्नात भर पाडण्यासाठी नवी मुंबई महापालिकेमार्फत वेगवेगळे उपाय आखले जात असले तरी येत्या आर्थिक वर्षात मालमत्ता करवसुलीचे एक हजार कोटी रुपयांचे लक्ष्य गाठण्याचे मोठे आव्हान महापालिकेपुढे असणार आहे. आर्थिक वर्षाला सहा महिने होऊन गेले तरी मालमत्ता कराची ३५० कोटी रुपयांची वसुली या विभागाने केली आहे. अखेरच्या काही महिन्यांमध्ये या वसुलीचा वेग वाढतो हे जरी स्पष्ट असले तरी महापालिका हा पल्ला कुठपर्यत गाठू शकेल या विषयी साशंकता व्यक्त होत आहे.**

मालमत्ता कर हा नवी मुंबई महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा स्रोत आहे. गेल्या आर्थिक वर्षात महापालिकेने ७१६ कोटी रुपयांच्या मालमत्ता कराची वसुली केली होती. २०२२-२३ या आर्थिक वर्षापेक्षा गेल्यावर्षी ८३.६६ कोटींनी अधिक मालमत्ता कर वसूल करण्यात आला होता. या आर्थिक वर्षात पालिकेने एक हजार कोटी रुपयांच्या मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य समोर ठेवले आहे. आतापर्यंत मालमत्ता कर विभागाने ३५० कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. यंदा महापालिका प्रशासनाने मालमत्ता कर थकबाकीदारांवर लक्ष केंद्रीत केले आहे. थकबाकी रकमेनुसार उतरत्या क्रमाने याद्या तयार करण्यात आल्या आहेत.

### अभय योजनेचे प्रयोग

मालमत्ता कराची वसुली वाढावी यासाठी महापालिकेने थकबाकीदारांसाठी अभय योजना लागू केली होती. महापालिकेने मागील वर्षी १ ते २० मार्च या कालावधीत थकबाकीच्या दंडात्मक रककमेवर ७५ टक्के सवलत तसेच २१ ते ३१ मार्च या कालावधीत ५० टक्के सवलत लागू केली होती. या योजनेचा लाभ थकबाकीदारांनी मोठया प्रमाणावर घेतला. आठ हजार ७४० थकबाकीदारांनी ११६ कोटी इतकी रक्कम अभय योजनेच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत भरली. यंदा लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीमुळे कर वसुलीवर परिणाम झाल्याचे चित्र असून या आर्थिक वर्षात ३५० कोटींचा मालमत्ता कर वसुल केला आहे.

नवी मुंबईकर नागरिकांनी शहराच्या प्रगतीत आपले योगदान देऊन पालिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त चांगल्या व दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी मालमत्ता कर भरणा करावा. यावर्षी १ हजार कोटी मालमत्ता कर वसुलीचे लक्ष असून आतापर्यंत ३५० कोटी मालमत्ता कर्ज जमा केला आहे.

**– शरद पवार, उपायुक्त, प्रशासन व मालमत्ता कर विभाग**

### मालमत्तांची संख्या

वर्ष २०२३ – ३ लाख ३० हजार
वर्ष २०२४ – ३ लाख ४६ हजार

### पालिकेची मागील काही वर्षातील मालमत्ता कर वसुली

| | |
|---|---|
| २०१८–१९ – ४८१. ४० कोटी | २०१९–२० – ५५८.९१ कोटी |
| २०२०–२१ – ५२७.८१ कोटी | २०२१–२२ – ५६२.०७ कोटी |
| २०२२–२३ – ६३३.३६ कोटी | २०२३–२४– ७१६.९७ कोटी |

२०२४–२५ १ हजार कोटी वसुलीचे लक्ष्य

# शासनाकडून मानधन घेणाऱ्या वृध्द साहित्यिक, कलावंतांनी आधारकार्ड अपडेट करावे

ठाणे – महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा, पर्यटन विशेष सहाय्यक विभागातर्फे राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक, कलावंत मानधन योजना राबविली जाते. १९५४–५५ या वर्षापासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा लाभ आता प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद, ठाणे समाज कल्याण विभागाच्या वतीने लाभार्थ्यांचे आधार कार्ड संकलनाचे काम चालू आहे. लाभार्थी कलाकारांनी आधार व्हेरीफिकेशन करण्याचे जाहिर आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

आधार व्हेरीफिकेशन करण्यापूर्वी वृध्द कलावंत यांनी आधार क्रमांक सोबत मोबाईल क्रमांक व बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे. ज्यांचे आधार कार्ड लिंक नसेल त्यांनी आधार केंद्रावर जाऊन आधार कार्ड अपडेट करावे.

ज्या वृध्द कलावंत व साहित्यीकांचे आधार कार्ड हे मोबाईल क्रमांक व बँक खाते लिंक आहेत, त्यांनी आधार व्हेरीफिकेशनसाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती – शहापूर, अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड, समाज कल्याण अधिकारी म.न.पा ठाणे, नवीमुंबई, कल्याण– डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा–भाईदर व प्रशासन अधिकारी कुळगाव–बदलापूर, अंबरनाथ नगरपालिका तसेच जिल्हा परिषद ठाणे जी. एस. टी कार्यालयासमोर वागळे इस्टेट, रोड न. २२, ठाणे (प) या कार्यालयातील ९६१९७८९१६४, ९२२५८५१७८९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी केले आहे.

तथापी प्राप्त माहितीतील कलावंतांचे मोबाईल क्रमांक आधार कार्डला लिंक नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्राप्त झालेले आधारकार्डची पडताळणी करण्याकरिता सांस्कृतिक कार्यालयामार्फत http://mahakalasanman.org/-adharVerification.aspx लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. या वेबसाईड मार्फत देखील माहिती तपासणी करता येणार आहे.



■ रायगड जिल्ह्यात टाटा पॉवरने महाराष्ट्र स्तरावर आयोजित केलेल्या ऊर्जा मेळ्यामध्ये १० शाळांमधील ६० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी मिळून नाविन्यपूर्ण ऍक्टिव्हिटीज मधून ऊर्जा संवर्धन विषयी माहिती आणि डढएच् शिक्षण मिळवले. रायगड जिल्ह्यातील खोपोली या ठिकाणी टाटा कंपनी मार्फत उर्जा मेळा २०२४ या महत्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित शिक्षणाचे महत्त्व वाढविणे हा आहे. यामध्ये विज्ञान, चित्रकला, प्रश्न मंजुषा स्पर्धा, पोस्टर मेकिंग, विज्ञान कार्य मॉडेल अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

## राहुल नार्वेकर दुसऱ्यांदा विधानसभेचे अध्यक्ष होणार?

**(पान १ वरून)** राहुल नार्वेकर यांना पुन्हा संधी जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचं आणि भाजपचं सरकार स्थापन झाल्यानंतर विधानसभा अध्यक्ष भाजपनं त्यांच्याकडे घेतलं होतं. भाजपनं त्यावेळी राहुल नार्वेकर यांना अध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. आता पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांच्याकडे विधानसभेचं अध्यक्षपद जाऊ शकतं, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. राहुल नार्वेकर हे कुलाबा विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून सलग दुसऱ्यांदा विजयी झाले आहेत.

## शरद पवार गटाचे आमदार उत्तमराव जानकरांवर गुन्हा दाखल

**(पान १ वरून)** दरम्यान, यावेळी पत्रकारांनी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारलं की उद्या देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर तुम्ही आणि अजित पवार उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहात का? यावर एकनाथ शिंदे म्हणाले, थोडं थांबा, संध्याकाळपर्यंत तुम्हाला सगळी माहिती मिळेल. तर, अजित पवार म्हणाले, थोडी कळ काढा, त्यांचं संध्याकाळी समजेल, मी तर उद्या शपथ घेणार आहे. मी थांबणार नाही. अजित पवारांच्या या वक्तव्यावर शिंदे यांनी एक मिश्किल टिप्पणी केली. ते म्हणाले, अजितदादांना अनुभव आहे. त्यांना संध्याकाळी शपथ घेण्याचा, त्याचबरोबर सकाळी शपथ घेण्याचा देखील अनुभव आहे. शिंदेंच्या या टिप्पणीवर अजित पवार कुरघोडी करत म्हणाले, मागच्या वेळी आम्ही दोघांनी (मी व देवेंद्र फडणवीस) सकाळी शपथ घेतली होती. परंतु, त्यावेळी सरकार चालवायचं राहिलं होतं. यावेळी पुढच्या पाच वर्षांसाठी सरकार चालवणार आहोत.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले? –** त्यानंतर, एकनाथ शिंदे म्हणाले, सगळ्यांनी थोडी कळ काढा. संध्याकाळपर्यंत सगळ्यांच्या मनातला गोंधळ दूर होईल. उद्या पाच वाजता शपथविधीला हजर व्हा. तिथे तुम्हाला सगळ्या बातम्या मिळतील. अडीच वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी मी मुख्यमंत्री व्हावं यासाठी शिफारस केली होती. आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत म्हणून आम्ही शिफारसपत्र दिलं आहे. मी साधा गावी गेलो तरी तुम्ही तुमच्या चर्चा चालवत असता. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हे सरकार स्थापन होतंय याचा मला आनंद आहे..

**एकनाथ शिंदेंना मंत्रीमंडळात राहण्याची फडणवीसांकडून विनंती –** मी एकनाथ शिंदेंना भेटून त्यांना विनंती केली की शिवसेनेच्या वतीने त्यांनी मंत्रीमंडळात राहावं. त्यांचाही सकारात्मक प्रतिसाद आम्हाला मिळेल अशी मला खात्री आहे. त्यामुळे आम्ही तिघे व आमच्या पक्षाचे इतर नेते, मित्रपक्ष असे मिळून चांगलं सरकार महाराष्ट्राला देण्याचा प्रयत्न आम्ही करू, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## कॅडबरी ब्रीज वळणावर कंटेनर उलटला

**(पान ३ वरून)** अशोक लेलँड कंटेनर हा न्हावा–शेवा, नवी मुंबई ते सुरत, गुजरात या ठिकाणी निघाला होता. बुधवारी संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास न्हावा–शेवा येथून निघालेला कंटेनर हा कॅडबरी ब्रिज यु टर्न जवळ पोहचला. दरम्यान माजिवडा कडे जाणाऱ्या वाहिनीवर कंटेनर हा उलटला घटनास्थळी शहर वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी मदतकार्य केले. कंटेनर उलटल्याने चालक कमलेश कुमार(२७) रा. न्हावा–शेवा याच्या पाठीला आणि दोन्ही पायांना किरकोळ दुखापत झाली. त्याच्यावर डॉक्टरांनी उपचार केले. घटनास्थळी माजीवाडाकडे जाणाऱ्या रोडवरती अपघात झाल्यामुळे कॅडबरी ब्रिज येथे वाहतूक कोंडी झाली आहे तसेच माजीवाडाच्या दिशेने जाणारी वाहतूक धिम्या गतीने सुरू आहे. तर हळूहळू वाहतूक पूर्वपदावर करण्यात येत आहेत. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, शहर वाहतूक पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने पलटी झालेला कंटेनर सरळ करण्याचे मदतकार्य करण्यात आले.

## राहत्या घरांचे भवितव्य काय? उरण, पनवेल आणि पेणमधील शेतकऱ्यांचा....

**(पान १ वरून)** भूसंपादन करतांना शासनाने २०१३ चा शेतकरी हिताचा भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा का डावलला आहे तसेच लोकप्रतिनिधी याची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देतील का असा सवाल कोप्रोली येथील शेतकरी रुपेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.

गेली अनेक वर्षे नैना या सिडकोच्या विभागाची अधिसूचना जारी करण्यात आली होती. ती रद्द करून शासनाने एमएमआरडीए मार्फत अधिसूचना काढून उरण, पनवेल आणि पेणमधील जमिनी संपादित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. सिडकोच्या नैना प्रकल्पा प्रमाणेच १२४ गावांतील गावठाणा शेजारी व शेत जमिनीवर बांधण्यात आलेली शेतकरी आणि त्यांच्या वारसांची राहती घरे यांचा प्रश्न यामुळे ऐरणीवर येणार आहे.

## राहुल नार्वेकर दुसऱ्यांदा विधानसभेचे अध्यक्ष होणार?

**(पान १ वरून)** २. यावेळची निवडणूक अतिशय ऐतिहासिक... ३. एक है तो सेफ है हे या निवडणुकीच्या निकालानं स्पष्ट केलं. ४. मोदी है तो मुमकीन है हे लोकसभेच्या निकालानंतर स्पष्ट झालं. ५. महाराष्ट्राच्या जनतेनं जे बहुमत दिलं आहे त्याकरता मी जनतेला साष्टांग दंडवत घालतो. ६. इथं मनानं उपस्थित असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आभार मानतो. ७. ज्या प्रक्रियेनं आपण निवडून येतो त्या संविधानाची ७५ वर्षं पूर्ण होतायत म्हणून हे महत्वाचं आहे. ८. माझ्याकरता भारताचं संविधान सगळ्यात महत्वाचं..प्रत्येकाला जगण्याचा अधिकार दिला. ९. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंतीवर्षी मी त्यांना नमन करतो... १०. भगवान बिरसामुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त त्यांना वंदन...
११. आपले सगळ्यांचे लाडके श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांना नमन करतो. १२. आपली प्राथमिकता आपण सुरू केलेली योजना आणि महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पुढे नेण्याकरता आपण कार्यरत राहू...
१३. २०१९ साली जनतेचा कौल आपल्याला मिळाला होता, दुर्दैवानं तो कौल हिसकावून घेत जनतेशी बेईमानी केली होती.
१४. सुरूवातीच्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात आपल्या आमदारांना त्रास दिला गेला तरीही एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही...
१५. माननीय मोदीजींचे मी आभार मानतो, की त्यांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी बसवलं
१६. आपल्याला कुणीतरी मोठं करावं म्हणून आपण राजकारणात आलो नाही...
१७. लार्जर इंटरेस्टमधे आपण एकत्र काम करू...कधीतरी काही गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होतात, काही मनाविरूद्ध होतात तरीही लार्जर इंटरेस्टमधे आपण सगळ्याशी जुळवून घेऊ...


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

मुख्य लेखा व वित्त विभाग
मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

ठाणे महानगरपालिकेच्या परिभाषित निधी या खात्यामधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगर पालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार माहिती व व्याजदर नमूद करुन cafoinvest@thanecity.gov.in या email वर अथवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला, ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.**०५/१२/२०२४** रोजी पर्यंत स्वतंत्र पत्र देऊन व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही. अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/लेवविवि/८९८/२०२४-२५
दि:०४.१२.२०२४

**सही/-**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४ | वर्ष : १३, अंक : २१८ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे



अग्रलेख

**नव्या सरकारचा आज शपथविधी**

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

......पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३२° से | किमान २७° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७७,३६७ | ९३,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



बरं झालं इव्हीएमवर मतदान झालं आणि निवडूनही आलो. गंमत म्हणजे आता इव्हीएमला विरोध होतोय.

## थोडक्यात घडामोडी

### सोन्या चांदीला पुन्हा एकदा झळाळी!

सोनं चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी एक निराशाजनक बातमी समोर आली आहे. दोन दिवसांच्या घसरणीनंतर सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या वाढत्या दरामुळं सोने खरेदी करणाऱ्यांच्या खिशाला अधिकची झळ बसत आहे. दरम्यान, या वाढत्या दरामुळं सोन्या चांदीची खरेदी करावी की नको असा प्रश्न निर्माण होत आहे. जाणून घेऊयात सोन्या चांदीच्या दरात नेमकी किती झाली वाढ?

### सोन्या चांदीच्या दरात किती झाली वाढ?–

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, सोन्याच्या दरात १५२ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळं सध्या २४ कॅरेट सोन्याचा दर हा सरासरी ७६४६० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. तर दुसऱ्या बाजुला चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. चांदीच्या दरात प्रति किलो १३८९ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळं आज चांदीचे दर ९०००० रुपयांवर गेले आहेत.

## महायुतीच्या नेत्यांकडून सत्तास्थापनेचा दावा, राज्यपालांची भेट घेत दिले पत्र

**मुंबईत आज भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एक मुखाने निवड करण्यात आल्यानंतर देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे नवे मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाला आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे नाव महायुतीकडून ठरल्यानंतर कार्यकर्त्यांसह नेत्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आनंद दिसतोय. दरम्यान, उद्या मुंबईतील आझाद मैदानावर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री शपथ घेणार आहे. असे असताना त्यापूर्वी महायुतीतील अनेक प्रमुख नेते राज्यपालांच्या भेटीसाठी राजभवनावर दाखल झाले आहे.या भेटीत महायुतीकडून सत्तास्थापनेचा दावा केला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे.**

# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसच !

### आज शपथविधी सोहळा





देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तीन नेते राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेत राज्यात सत्तास्थापनेचा दावा केला. तर आज शपथविधी आझाद मैदानावर होणार आहे. यासाठी इतर पक्षाचे अनेक दिग्गज नेते आणि प्रमुख ही हजेरी लावणार आहेत. यासाठी दिल्ली, मणीपूर, नागालँड आणि मेघालय राज्याचे प्रमुख आज मुंबईत येणार असल्याची माहिती पुढे आली आहे. महायुतीच्या शपथविधी समारंभात तिन्ही पक्षाचे राष्ट्रीय पातळीवर नेते ही हजेरी लावणार आहेत. आझाद मैदानावर महाशपथविधीची जोरदार तयारी सुरू आहे.

## शिंदेंचं माहित नाही, मी तर शपथ घेणार, अजित पवारांचं मिश्कील वक्तव्य, तर शिंदेंनीही घेतली फिरकी



मुंबई – फडणवीस, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान भवनावर जाऊन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमोर सत्तास्थापनेचा दावा केला. त्यानंतर या तिन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद घेत उद्या होणारा शपथविधी व सत्तास्थापनेबाबतची माहिती दिली. दरम्यान, या पत्रकार परिषदेत तिन्ही नेत्यांनी गंमतीदार प्रतिक्रिया दिल्या, तसेच एकनाथ शिंदे व अजित पवारांनी एकमेकांना चिमटे काढले. (पान २ वर)

## देवेंद्र फडणवीसांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड

मुंबई: आज भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली. भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत आमदारांनी देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड केली. या सर्व निवड प्रक्रियेनंतर आता देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे नवे मुख्यमंत्री होणार हे आता स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीसांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी सगळ्यांचे आभार मानले. एकमताने माझी विधिमंडळ गटनेतापदी निवड केली. यावेळची निवडणूक अतिशय ऐतिहासिक होती. एक है तो सेफ है हे या निवडणुकीच्या निकालानं स्पष्ट केलं. तर मोदी है तो मुमकीन है हे लोकसभेच्या निकालानंतर स्पष्ट झालं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांचं पहिलं भाषण, काय काय म्हणाले?, टॉप १० मुद्दे

१. सगळ्यांचे आभार की एकमताने माझी विधीमंडळ गटनेतापदी निवड केली... (पान २ वर)

## राहुल नार्वेकर दुसऱ्यांदा विधानसभेचे अध्यक्ष होणार?

मुंबई – महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं बहुमत मिळवलं. भाजपला १३२, एकनाथ शिंदे यांची शिवसेना ५७ आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला ४१ जागांवर विजय मिळाला. मित्रपक्षांसह महायुतीचं संख्याबळ २३६ इतकं झालं आहे. महायुतीकडे मोठं संख्याबळ असल्यानं विधानसभा अध्यक्ष तीन पक्षांमध्ये कुणाकडे जाणार याबाबत देखील चर्चा सुरु झाल्या होत्या. मात्र, विधानसभा अध्यक्षपद पुन्हा एकदा भाजपकडे जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. भाजपकडून विधानसभा अध्यक्ष म्हणून (पान २ वर)



### विशेष अधिवेशन ७ ते ९ डिसेंबरला

महाराष्ट्राच्या विधानसभेत नव्या सरकारला विश्वासदर्शक ठराव मांडावा लागेल. त्याशिवाय आमदारांचा शपथविधी सोहळा, विधानसभा अध्यक्षांची निवड यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्यात येणार आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशात देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला बहुमत सिद्ध करावं लागेल. त्यासाठी ७,८ आणि ९ डिसेंबरला विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावलं जाणार आहे. ७ आणि ८ डिसेंबरला सर्व आमदारांचा शपथविधी पार पडणार असल्याची माहिती आहे. ९ डिसेंबरला नव्या विधानसभा अध्यक्षांची निवड होणार आहे.

# शरद पवार गटाचे आमदार उत्तमराव जानकरांवर गुन्हा दाखल

माळशिरस: राज्यासह देशभरात चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावात बॅलेट पेपरवर चाचणी मतदान घेण्याचा निर्णय घेतला आला होता. त्या मतदानास प्रशासनाचा विरोध दर्शवला होता. गावात कलम १४४ लागू करण्यात आले होते. त्यानंतरही मतदान घेणारच असल्याचे उत्तम जानकर (Uttamrao Jankar) यांनी म्हटले होते. मात्र, पोलिस प्रशासनाने एक जरी मतदान झाले तर गुन्हे दाखल करू, असा इशारा दिला होता. त्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जानकर (र्णीरीरे गरपज्ञरी) यांनी स्थानिकांशी चर्चा करून ही चाचणी प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता माळशिरच्या मारकडवाडी बॅलेट पेपर मतदान प्रकरणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार उत्तमराव जानकरांवर (Uttamrao Jankar) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमदार जानकरांसह (Uttamrao Jankar) शेकडो ग्रामस्थांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मारकडवाडी प्रकरणात पोलिसांकडून आतापर्यंत दोन गुन्हे दाखल करण्यात आलेत. मतदान प्रक्रियेसाठी पुढाकार घेणाऱ्या मारकडवाडीतील १७ जणांसह अन्य १०० ते २०० ग्रामस्थांच्या विरोधात पहिला गुन्हा नोंद करण्यात आला. तर जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी आमदार उत्तमराव जानकारांसह ८९ ज्ञात आणि १०० ते २०० इतर आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. आमदार उत्तमराव जानकर आणि ग्रामस्थांवर बीएनएस १८९ (१), (२), १९०, २२३ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. माळशिरसच्या नातेपुते पोलीस ठाण्यात सर्व आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



**मारकडवाडी बॅलेट पेपर मतदान प्रकरणी कारवाई**

### नेमकं काय आहे प्रकरण?

विधानसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएमवरती शंका घेत उत्तम जानकर गटाने बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी प्रशासनाकडे केली होती. प्रशासनाने मागणी फेटाळून लावली होती. मात्र, तरी देखील ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची प्रक्रिया सुरू ठेवली होती. पोलिस प्रशासनाने प्रक्रिया थांबवा, अन्यथा गुन्हे दाखल करू, अशी नोटीस देखील दिली होती. दरम्यान, आमदार उत्तम जानकर (र्णीरीरे गरपज्ञरी) यांनी ग्रामस्थांची बैठक घेऊन प्रक्रिया मागे घेत कायदेशीर मार्गाने लढा देण्याची भूमिका घेतली होती.

# राहत्या घरांचे भवितव्य काय? उरण, पनवेल आणि पेणमधील शेतकऱ्यांचा सरकारला सवाल

**उरण : शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( एमएमआरडीए) कडून उरण,पनवेल आणि पेण मधील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सिडकोच्या नैनाप्रमाणे शेतकऱ्यांच्या राहत्या घरांचे काय होणार असा सवाल केला जात आहे. तर राज्यातील नवे सरकार येथील शेतकऱ्यांनी केलेल्या सूचना आणि हरकतीची नोंद घेणार का, असा सवाल शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.**

तिसरी मुंबई विकसित करण्यासाठी एमएमआरडीएची नव नगर विकास प्राधिकरण (एनटीडीए) म्हणून नियुक्ती केल्याची अधिसूचना जाहीर केला आहे. यासाठी उरण तालुक्यातील २९,पनवेल मधील – ७ तर पेण मधील ८८ आशा एकूण १२४ गावातील ३३२ चौरस किलोमीटर क्षेत्रावर हे नवे शहर उभारण्यात येणार आहे. या शहराला मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर कर्नाळा– साई – चिरनेर(के एस सी) संकुल या नावाने ओळखले जाणार आहे. यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शासनाने निर्णय घेतल्याने विरोध करण्यास सुरुवात केली आहे. मार्च महिन्यात कोकण भवन येथील कोकण नगररचना विभागाकडे शेतकऱ्यांनी २५ हजार हरकती व सूचना नोंदविल्या होत्या. मात्र या संदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आदल्या दिवशी एमएमआरडीएची नव नगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. शहर आणि उद्योग निर्मितीसाठी सरकारकडून शेतकऱ्यांच्या जमीनी हिसकावून घेतल्या जात असल्याने एमएमआरडीएच्या अधिसूचनेला शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या होत्या. याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

पचावन्न वर्षांपूर्वी सरकारने सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईसाठी उरणच्या पश्चिम भागातील जमीनी संपादित केल्या आहेत. त्यानंतर तालुक्यात ओएनजीसी, जेएनपीटी बंदर,वायू विद्युत केंद्र, भारत पेट्रोलियम प्रकल्प, बंदरावर आधारित सेझ, उद्योग,नव्याने येणारा अलिबाग विरार कॉरिडॉर, एमआयडीसीचा उद्योग, सिडकोचा रिजनल पार्क,लॉजिस्टिक पार्क,नवी मुंबई सेझ प्रकल्प या प्रकल्पासाठी भूसंपादन झाले आहे. तर आता एमएमआरडीए उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांतील शेत जमीनी आणि इतर जमीनीचा यात समावेश आहे. गेली अनेक वर्षे नैना या सिडकोच्या विभागाची अधिसूचना जारी करण्यात आली होती. ती रद्द करून शासनाने एमएमआरडीए मार्फत अधिसूचना काढून येथील जमीनी संपादित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या असलेल्या या जमीनीवर शेतकऱ्यांनी आपल्या भावी पिढीसाठी घरांचे बांधकाम केले आहे. या घरांचे मूळ गावांचे काय होणार, (पान २ वर)





## कॅडबरी ब्रीज वळणावर कंटेनर उलटला-चालक जखमी

ठाणे – ठाण्याच्या कॅडबरी ब्रिज यु टर्न जवळ माजीवाडा कडे जाणाऱ्या रोडवरती अशोक लेलँड कंटेनर वरील नियंत्रण सुटल्याने कंटेनर उलटला. सदरची घटना यामुळे वाहतुकीचा चक्का जॅम झाला होता. कंटेनर बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली. या घटनेत कंटेनर चालक कमलेश कुमार याच्या दोन्ही पाठीला आणि दोन्ही पायांना दुखापत झाली. (पान २ वर)

# सिगारेट, तंबाखू ते कोल्ड ड्रिंक महागणार, जीएसटी स्लॅब ३५ टक्क्यांवर जाणार...

**■ जीएसटी परिषदेच्या बैठकीत निर्णय होणार?**

नवी दिल्ली : वस्तू आणि सेवा कराच्या संदर्भात येत्या काही दिवसांमध्ये मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटीच्या परिषदेची बैठक २१ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. बैठकीत कोल्ड ड्रिंक, सिगारेट ते तंबाखू या सारख्या पदार्थांवरील जीएसटी कर वाढवला जाण्याची शक्यता आहे. या पदार्थांवर सध्या २८ टक्के जीएसटी लागू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वाढ करुन ३५ टक्क्यांपर्यंत वाढ केली जाऊ शकते. एका अधिकाऱ्याच्या माहितीनुसार बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिगटानं कोल्ड ड्रिंक,





तंबाखू आणि सिगारेटवरील जीएसटीच्या करामध्ये वाढ करण्याच्या प्रस्तावाला तर्कसंगत असल्याचं म्हटलंय.

मंत्री गटाच्या बैठकीत झालेल्या निर्णयांवर जीएसटी परिषदेत अंतिम निर्णय घेतला जाईल. मंत्री गटाकडून एकूण १४८ वस्तूंवरील कर बदलण्याचा प्रस्ताव दिला जाईल.

**जीएसटीचे स्लॅब कोणत्या प्रकाराचे ? –** एका अधिकाऱ्याच्या माहितीनुसार मंत्रिगटानं तंबाखू, तंबाखूजन्य उत्पादनं आणि कोल्डड्रिंक्सवर ३५ टक्के कर लावण्याच्या प्रस्तावावर सहमती दर्शवली. अधिकाऱ्यांनं दिलेल्या माहितीनुसार ५,१२,१८,२८ असे चार स्लॅब सध्या आहेत. मंत्रिगटाच्या प्रस्तावानुसार ३५ टक्क्यांचा स्लॅब येऊ शकतो.

### २१ डिसेंबरला जीएसटी परिषदेच्या बैठकीची शक्यता

मंत्रिगटाच्या अहवालावर २१ डिसेंबरला जीएसटी परीषदेच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. जीएसटी परिषदेचं अध्यक्षपद निर्मला सीतारमण यांच्याकडे असेल. याशिवाय सर्व राज्यांचे अर्थमंत्री देखील उपस्थित असतील. जीएसटीच्या दरांमधील बदलांबाबत त्यामध्ये चर्चा होईल.

मंत्रिगटानं १५०० रुपयांपर्यंतच्या तयार कपड्यावर ५ टक्के जीएसटी लावण्याचा प्रस्ताव दिला आहे. तर,१५०० रुपये ते १०००० हजार रुपयांच्या पर्यंतच्या कपड्यावर १८ टक्के जीएसटी तर २८ टक्के जीएसटी १० हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या कपड्यांवर लावला जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जीएसटी परिषदेच्या बैठकीत आरोग्य विमा आणि जीवन विमा यांच्यावरील जीएसटीच्या कराच्या क्लबमध्ये बदल केले जाण्याची शक्यता आहे. मंत्रिपरीषदेच्या बैठकीत दर कमी झाल्यास विम्यासाठी करावा लागणारा खर्च कमी होऊ शकतो.

ईव्हीएमविरोधी आंदोलन तापू लागले

# इव्हीएममध्ये छेडछाड केली गेलेय-डॉ.आव्हाड






**ठाणे – ईव्हीएम हटाओ... लोकशाही बचाओ असा नारा देत विधिमंडळ गटनेते डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सामान्य नागरिकांची सुमारे दहा हजार पोस्टकार्ड पाठविली.**

गेल्या काही निवडणुकांचा धांडोळा घेतल्यास ईव्हीएमबाबत जनतेच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच प्रत्यक्ष मतदान आणि ईव्हीएममधील मतदान यामध्ये तफावत असल्याचीही काही प्रकरणे उघडकीस आली आहेत. ही बाब गंभीर असून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण करणारी आहेत, असा आरोप करून डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्ष सुजाताताई घाग, महिला कार्याध्यक्ष सुरेखाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या ठिकाणी कोरे पोस्टकार्ड ठेवून ईव्हीएम घोटाळ्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच, नागरिकांना आवाहन करून राष्ट्रपतींना पत्र पाठविण्याचे आवाहन करण्यात आले.

सामान्य भारतीय नागरिकांच्या मनात ईव्हीएमबाबत संशय अधिकाधिक गडद होत असल्याने भावी काळात लोक मतदानापासून दूर जाण्याची शक्यता असल्याने ईव्हीएमवर बंदी आणून जगभरात ज्या पद्धतीने मतपत्रिकेवर मतदान घेतले जात आहे. त्याच पद्धतीने भारतात मतपत्रिकेचा वापर करावा, अशा आशयाचा मजकूर या पोस्टकार्डवर लिहिण्यात आला होता. ही सर्व

- राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने स्वाक्षरी मोहिम, नागरिकांचा प्रचंड सहभाग
- जनजागृतीस्पर राष्ट्रपतींच्या नावे कोरे पोस्ट कार्ड...
- जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पत्रे पाठविण्यासाठी सर्वसामान्यांची गर्दी

पोस्टकार्ड मुख्य डाक कार्यालयातील पत्रपेटीमध्ये डॉ. जितेंद्र आव्हाड यांनीच टाकली.

या वेळेस डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, इव्हीएम हॅक केले असा आमचा आरोप नाही. मात्र, इव्हीएममध्ये छेडछाड करण्यात आली, असे आमचे मत आहे आणि त्यावर आम्ही ठाम आहोत. १७ सी चा फॉर्म आणि झालेले मतदान यांची आकडेवारी जर जुळत नसेल तर नक्कीच काही तरी घोटाळा आहे. पाच वाजता ५२% मतदान होते. नंतर ते ६५-६८% टक्के झाले. ही आकडेवारी कशी वाढली? एकदम १३% वाढ म्हणजे झालेल्या मतदानाच्या एक चतुर्थांश मतदान अवघ्या तासाभरात होऊ शकते का? ही वाढ कुठून झाली? यावर निवडणूक आयोग काहीही बोलायला तयार नाही. टाकलेली मते आणि मोजलेली मते यामध्ये यामध्ये फरक येतोय. इव्हीएममध्ये जर संगणकप्रणाली वापरली जात असेल तर मतदानाची टक्केवारी काढण्यासाठी असे कुठले मोठे रॉकेट सायन्स आणावे लागतेय. हा सगळा कुणाच्या तरी आदेशावरून झालेला घोळ आहे. त्यामुळेच आता जनआंदोलन सबंध भारतभर उभे राहिल. कारण, जर असेच घडत राहिले तर या देशाची लोकशाही संपुष्टात येईल. म्हणूनच आम्ही राष्ट्रपतींना हजारो नागरिकांची पत्रे पाठविली असून बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याची विनंती केली आहे. जर अमेरिकेतील मतमोजणी अडीच दिवस चालत असेल तर आपल्याकडे काय अडचण आहे. लोकशाहीत मतदान प्रक्रिया ही पारदर्शी असली पाहिजे. मी टाकलेले मत कुठे गेले आहे, हे.मला कळलेच पाहिजे. त्यासाठीच आम्ही आता राष्ट्रपतींना विनंती केली आहे.

यावेळी मिलिंद साळवी, अपर्णा साळवी, रचना वैद्य, प्रशासन सरचिटणीस राजेश जगन्नाथ साटम, राजेश कदम, मिलिंद बनकर, राजु चापले, गजानन चौधरी, जतिन कोठारे, दिलीप नाईक, माधुरी सोनार, कैलास हावळे, ज्योती निंबर्गी, सुनीता मोकाशी, सुनील कुऱ्हाडे , अजित मोरे, आशिष खाडे, शेखर भालेराव, संजीव दत्ता, संदीप ढकोलिया, विक्रम सिंह, मकसुद खान, जग्गत सिंग, प्रदीप साटम आदी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




■ मुख्यमंत्री आणि विधीमंडळाच्या नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली आहे. त्याबद्दल पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, विधानसभा संयोजक व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील व इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भाजपच्यावतीने ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषात जल्लोष करण्यात आला. आज झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळाचा नेता म्हणून निवड करण्यात आली आहे. उद्या (गुरूवारी) ५ डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर शपथविधी सोहळा पार पडणार आहे. मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीनंतर राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस काम पाहणार आहेत.

# कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

नवी मुंबई (गणेश भोईटे)- नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत (१) श्रीम. छाया दत्ता किर्जत, एस.एस टाईप, रूम नं ४९५,सेक्टर-१७,कोपरखैरणे, नवी मुंबई, व (२) श्रीम.प्रभावती मच्छींद्र पाटील,घर क्र.०५९१, युनिटस ०००३, बोनकोडे कोपरखैरणे नवी मुंबई. यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत



तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त प्रबोधन मवाडे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवाड व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी नमुंमपा पोलीस बंदोबस्त होता. तसेच ९ मजूर, ०२ इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर ०१,पिकअप व्हॅन ०१ कारवाई करीता वापर करण्यात आले.

यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# आवक घटल्याने टोमॅटो, मटारच्या दरात वाढ

नवी मुंबई (गणेश भोईटे) - मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटो आणि मटारची आवक कमी होत असून दर वधारले आहेत. मागील एक महिन्यापासून टोमॅटो दर आवाक्यात होते परंतु टोमॅटोच्या दराने पुन्हा उसळी घेतली असून प्रतिकिलो चाळीशी गाठली आहे. हिरव्या वाटाण्याच्या दरातही वाढ झाली आहे.

बदलत्या वातावरणाने टोमॅटोच्या दर्जावर परिणाम होत आहे. त्याचबरोबर परतीच्या पावसाने टोमॅटो पिकाचे नुकसान झाल्याने बाजारात सध्या आवक कमी होत असून त्यामुळे दरात वाढ झाली आहे. बाजारात २८ गाड्यांद्वारे १४६८ क्विंटल टोमॅटो आवक झाली आहे. दरात प्रतिकिलो १०-१२ रुपयांची वाढ झाली आहे. मंगळवारी घाऊक बाजारात प्रतिकिलो ४० रुपयांनी विक्री झाली आहे. मागील काही दिवसांपासून मटार म्हणजेच मटारचे दर आवाक्यात आले होते, परंतु मंगळवारी पुन्हा घाऊक बाजारात वाटाण्याची आवक घटल्याने दरात प्रतिकिलो १५-२० रुपयांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात आधी प्रतिकिलो ६५-७० रुपयांनी उपलब्ध असलेला वाटाणा आता ८०-९० रुपयांनी विक्री होत आहे.

मटारचीही आवक कमी आहे. मंगळवारी २० गाड्यांमधून ९३५ क्विंटल वाटाणा दाखल झाला आहे. राज्यातील सातारा ,नाशिक येथील वाटाणा दाखल होत आहे तर परराज्यातील आवक कमी झाली आहे. पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका बसत असल्याने आवक कमी होत आहे. तसेच हिरव्या वाटाण्याला ज्याठिकाणी अधिक बाजारभाव आहे त्याठिकाणी त्याचा पुरवठा वाढला आहे. त्यामुळे ही एपीएमसीत आवक रोडावली आहे. यंदा मटारचे उत्पादन आणि आवक कमीच असेल अशी माहिती व्यापारी बाळासाहेब बडदे यांनी दिली.

### यंदा मटारचे उत्पादन कमीच

एपीएमसीत डिसेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात हिरवा वाटाणा दाखल होण्यास सुरुवात होत असते, शिवाय डिसेंबरमध्ये वाटण्याचा खरा हंगाम सुरू होतो तर वर्षभर तुरळक वाटाणा दाखल होत असतो. बाजार समितीत राज्यातील आणि मध्य प्रदेशातून मटारची आवक होते. मात्र सध्या परतीच्या पावसामुळे वाटणाच्या उत्पादनाला फटका बसला आहे. त्यामुळे बाजारात आवक कमीच आहे. पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका टोमॅटो आणि मटार पिकांना बसला आहे. परिणामी आवक घटून दर वाढले आहेत.



# स्वस्तिका घोषने पटकाविला विजेतपद; ऑलिंपियन खेळाडूला केले पराभूत



पनवेल (प्रतिनिधी)- अखिल भारतीय आंतर संस्थात्मक टेबल टेनिस ५१ व्या चॅम्पियनशिप स्पर्धेत टेबल टेनिसपटू व सिकेटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्वस्तिका संदीप घोष हिने एकेरी महिला गटात विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे तिने ऑलिम्पिक खेळाडू श्रीजा अकुला हिचा पराभव करत दैदिप्यमान कामगिरी केली. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिका घोष हिचे अभिनंदन केले.

२४ ते २९ नोव्हेंबर दरम्यान चंदीगड येथील पंजाब विद्यापीठ जिम्नॅशियम हॉलमध्ये हि स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत खारघर टेबल टेनिस अकादमी आणि सीकेटी कॉलेज पनवेलची विद्यार्थिनी असलेल्या स्वस्तिका घोषने भारतीय विमानतळ प्राधिकरणचे प्रतिनिधित्व केले. स्वस्तिका घोष सध्या भारतात महिला गटात १४ व्या तर जागतिक रँकमध्ये १२८ व्या क्रमांकावर आहे. या स्पर्धेत तिने तीन पदके जिंकली. महिला एकेरीमध्ये चॅम्पियन आणि महिला दुहेरीमध्ये उपविजेते आणि सांघिक स्पर्धेत कांस्यपदक मिळविले. स्वस्तिका घोषच्या नेतृत्वाखाली भारतीय विमानतळ प्राधिकरण टीमने चमकदार कामगिरी करत या स्पर्धेत सर्वोच्च १२० गुण मिळवले. अंतिम फेरीत स्वस्तिकाने भारत रँक एक

■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून स्वस्तिकाचे अभिनंदन!

आणि जागतिक रँक २३ ऑलिंपियन खेळाडू श्रीजा अकुलाला ४-२ सेट स्कोअरने पराभूत केले आणि प्रथम आंतर संस्थात्मक चॅम्पियन बनले.

या विजयाबद्दल बोलताना स्वस्तिकाचे वडील आणि प्रशिक्षक संदीप घोष यांनी सांगितले कि, या विजेतेपदामुळे स्वस्तिकाची रँक सुधारण्यास आणि भारतीय संघात पुन्हा निवड होण्यास मदत झाली आहे. २०२१-२२ मध्ये स्वस्तिका भारतात चौथ्या क्रमांकावर होती. तिने वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि वर्ल्डकपसाठी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले, तसेच कॉमनवेल्थ इंडिया संघात पाचव्या क्रमांकाची खेळाडू ठरली आहे. या आंतरसंस्थात्मक टीटी चॅम्पियनशिप बरोबरच स्वस्तिकाने पंचकुला हरियाणा येथे १६ ते २२ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस चॅम्पियनशिप नॉर्थ झोन स्पर्धेत आणखी एक महत्त्वाचे कांस्यपदक जिंकले. त्यामुळे एकूणच स्वस्तिकाने यशाची घौडदौड सुरू ठेवली असून या स्पर्धा तिला आत्मविश्वास देणारे ठरले आहे.

## कासाडी नदी संवर्धनाच्या कामाला लवकरात लवकर सुरुवात करा – आ.प्रशांत ठाकूर

पनवेल - कासाडी नदी संवर्धनाच्या कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असून या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल तालुक्यातील तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कासाडी नदीच्या संवर्धनाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. कासाडी नदीपात्रात अत्यंत घातक दुषित पाणी सोडले जाते, त्यामुळे परिसर अत्यंत प्रदुषित झाला आहे व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. या नदीत होणाऱ्या प्रदुषणाबाबत परिसरातील नागरिकांच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून माझ्याकडे प्राप्त झाल्या आहेत. घातक वायू रसायने प्रक्रिया न करता नदीमध्ये सोडल्यामुळे नदीमधील जैवविविधता धोक्यात आली असून सदर नदीच्या संवर्धनासंदर्भात मी वारंवार शासनाचे लक्ष वेधले आहे. शासनाकडून नदीच्या संवर्धनाबाबत तातडीने पाऊल उचलणे गरजेचे असून तळोजा एमआयडीसीमधील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी कासाडी नदीच्या संवर्धनाच्या कामास लवकरात लवकर सुरूवात करण्याचे आदेश संबंधिताना देण्यात यावे, असेही या निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे नॅक पिअर टीमची व्हिजीट

**पनवेल (प्रतिनिधी) राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषद ही देशभरातील उच्च शिक्षण प्रदान करणाऱ्या शैक्षणिक संस्थानांचे शास्त्रीय पद्धतीने शैक्षणिक परीपेक्ष्य, अध्ययन-अध्यापन प्रणाली, विस्तारकार्य, संशोधन, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन आदी निकषांच्या आधारे मुल्यांकन करून त्यांना श्रेणी प्रदान करते. याच धर्तीवर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या चौथ्या मूल्यांकनाच्या फेरीसाठी नॅक पिअर टीमची भेट दि. २ आणि ३डिसेंबर २०२४ रोजी यशस्वीपणे संपन्न झाली. या शैक्षणिक मुल्यांकन भेटी दरम्यान नॅक पिअर टीम सदस्यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, सह-शैक्षणिक, विस्तार विभाग तथा महाविद्यालयातील पायाभूत सुविधांची पाहणी केली.**

नॅक पिअर टीमचे चेअरमन कलिंगा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. श्रीधर, समन्वयक सदस्य म्हणून सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात मधील जैविक विज्ञान विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. कमलेशकुमार पटेल व सदस्य म्हणून यमुनानगर हरियाणा येथील गुरुनानक गर्ल्स कॉलेज च्या संचालिका डॉ. वरिंदर गांधी यांचे महाविद्यालयाच्या संकुलात दि.०२ डिसेंबर २०२४ रोजी आगमन झाले. महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅक पिअर टीम सदस्यांना मानवंदना दिली. या नंतर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी नॅक पिअर टीम सदस्यांचे यथोचित स्वागत व सत्कार केला. स्वागतानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाचे नॅक पिअरटीम सदस्यांसमक्ष सर्वंकष सादरीकरण केले. त्यानंतर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी सादरीकरण केले. तसेच विविध शैक्षणिक विभागांचे सादरीकरण होऊन समितेने विस्तार उपक्रमांच्या विभागांना, ग्रंथालय, आदी सुविधांना भेट दिली.

सर्व विभागांच्या भेटी संपन्न झाल्यानंतर विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, यांच्यासोबत परिसंवाद झाला. यानंतर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. रवींद्र कुलकर्णी आणि प्र. कुलगुरू डॉ. अजय भामरे यांनी महाविद्यालयास भेट दिली. दिवसाच्या शेवटी सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाची सांगता झाली. भेटीच्या दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाच्या बॉटनिकल गार्डन, बायोफर्टीलायझर प्लांट या ठिकाणी भेट दिली. दुपारनंतर मूल्यमापन अहवाल लेखन आणि समारोप कार्यक्रमानंतर यशस्वीरीत्या सांगता झाली.

# बैतुलमल वेलफेर फाउंडेशनच्यावतीने फिजिओथेरपी आणि स्किन क्लिनिक सुरू





कळवा - कळवा परिसरातील बैतुलमल वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने कळवा विभागातील नागरिकांसाठी फिजिथेरपी स्किन ईसीजी क्लिनिकचे उद्घाटन दि:१/१२/२०२४ रोजी करण्यात आले त्याप्रसंगी स्किन स्पेशलिस्ट डॉ. तृप्ती भानुषाली फिजिओथेरपी स्पेशलिस्ट डॉ झेबा शेख डॉ कामरान फकी मा.विरोधी पक्ष नेता मिलिंद पाटील मा. विरोधी पक्ष नेत्या श्रीमती प्रमिला ताई केणी परिवहन सदस्य प्रकाश पाटील विभाग प्रमुख विजय शिंदे नालासोपारा समाजसेवक खलीद करारी, अब्बास फौजी, हबीब पटेल मान्यवर उपस्थित होते अत्यंत अल्प दरामध्ये या क्लिनिकमध्ये फिजिओथेरपी स्किन व ईसीजी स्पेशलिस्ट डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे गेल्याच वर्षी बैतुलमल वेलफेयर फाउंडेशनच्या संस्थेच्या माध्यमातून वतीने ब्लड टेस्ट डायबिटीस चेक अप डोळे तपासणी दंतचिकित्सा इतर आरोग्य विषयक सल्ला क्लिनिक सुरू करण्यात आली होती बैतुलमल वेलफेअर फाउंडेशन संस्थेचे उद्दिष्ट आहे की अल्प दरामध्ये गोरगरीब जनतेला या सगळ्या आरोग्य संदर्भातील तपासण्या अल्प दरामध्ये देण्याचा मानस आहे आज प्रत्येक नागरिकाला औषध घेणे किंवा एखादी तपासणी करणे परवडण्यासारखं नाही म्हणूनच बैतुलमल वेलफेर फाउंडेशनच्या सभासदांनी सामान्य नागरिकांची आरोग्य जनसेवा करण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१